**संदर्भः–** 1) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र जा.क्र. बी (जन) –5601/57/2024/2203, दिनांक 05 डिसेंबर, 2024.
2) जिल्हा न्यायालय,उस्मानाबाद यांचे आस्थापनेकरीता कनिष्ठ लिपीक या पदाची दिनांक 05 डिसेंबर, 2024 रोजी प्रसिध्द करणेत आलेली निवड यादी.
3) District Court, Osmanabad Notification Hkw/Admn/705/25, 706/25 & 707/25, Dt. 22nd January, 2025.
4) सल्लागार समिती, जिल्हा न्यायालय, धाराशिव यांचे दिनांक 22 जानेवारी, 2025 रोजीचे बैठकीचे इतिवृत्त.

# आदेश

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद हे खालील कर्मचारी यांचे स्थलांतराचे/पदोन्नतीचे/प्रथम नियुक्तीबाबतचे खालील प्रमाणे आदेश निर्गमित करितात, हे आदेश **दिनांक 01 फेब्रुवारी, 2025 रोजी** मध्यान्हपूर्व पासुन अंमलात येतील.

| अ. क्र. | कर्मचारी यांचे नाव, पद व ठिकाण | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| 1) | **श्री.एम.ए.मुजळगेकर,**<br>अधिक्षक,<br>जिल्हा न्यायालय–1, **परंडा.** | **अधिक्षक,**<br>जिल्हा न्यायालय–1, **उमरगा** येथे श्री.जी.एम.पत्रिके यांचे सेवानिवृत्तीमुळे रिक्त असलेल्या पदी. |
| 2) | **श्री.एस.बी.दळवे,**<br>सहा.अधिक्षक,<br>सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, **परंडा.** | **पदोन्नतीने अधिक्षक,**<br>**जिल्हा न्यायालय–1, परंडा** येथे श्री.एम.ए.मुजळगेकर यांचे स्थलांतरामुळे रिक्त होत असलेल्या पदी. |
| 3) | **श्री.बी.व्ही.वाघमारे,**<br>वरिष्ठ लिपीक,<br>दिवाणी न्यायालय, क.स्तर, **तुळजापूर.** | **पदोन्नतीने सहा.अधिक्षक,**<br>सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, **परंडा** येथे श्री.एस.बी.दळवे यांचे पदोन्नतीमुळे रिक्त होत असलेल्या पदी. |
| 4) | **श्री.आर.जी.माने,**<br>वरिष्ठ लिपीक,<br>जिल्हा न्यायालय–3, **उस्मानाबाद.** | **पदोन्नतीने सहा.अधिक्षक,**<br>सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, **उमरगा** येथे श्री.बी.व्ही.जाधव यांचे सेवानिवृत्तीमुळे रिक्त होत असलेल्या पदी. |
| 5) | **श्री.ए.डी.गंगावणे,**<br>कनिष्ठ लिपीक,<br>जिल्हा न्यायालय, **उस्मानाबाद.** | **पदोन्नतीने वरिष्ठ लिपीक,**<br>दिवाणी न्यायालय, क.स्तर, **तुळजापूर** येथे श्री.बी.व्ही.वाघमारे यांचे पदोन्नतीमुळे रिक्त होत असलेल्या पदी. |
| 6) | **श्री.एस.एस.चिंदाले,**<br>कनिष्ठ लिपीक,<br>दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, **कळंब.** | **पदोन्नतीने वरिष्ठ लिपीक,**<br>जिल्हा न्यायालय–3, **उस्मानाबाद** येथे श्री.आर.जी.माने यांचे पदोन्नतीमुळे रिक्त होत असलेल्या पदी. |
| 7) | **श्री.लक्ष्मण प्रकाश गोरवे,**<br>(कनिष्ठ लिपीक, निवड यादी–2024, उमेदवार क्र.51)<br>रा. मु.पो.**राघुचीवाडी, ता.जि.धाराशिव.** | **स्थानापन्न कनिष्ठ लिपीक,**<br>जिल्हा न्यायालय, **उस्मानाबाद** येथे श्री.ए.डी.गंगावणे यांचे पदोन्नतीमुळे रिक्त असलेल्या पदी. |

| | | |
|---|---|---|
| 8) | **श्री.सागर विलासराव गवळी,**<br>(कनिष्ठ लिपीक, निवड यादी–2024, उमेदवार क्र.52)<br>रा. साई नगर, गल्ली नंबर–01, हिरो शोरुम समोर, **धाराशिव, ता.जि.धाराशिव.** | **स्थानापन्न कनिष्ठ लिपीक,**<br>दिवाणी न्यायालय, व.स्तर, **कळंब** येथे श्री.एस.एस.चिंदाले यांचे पदोन्नतीमुळे रिक्त होत असलेल्या पदी. |

अनु.क्र. 01 वरील कर्मचारी यांचे स्थलांतर त्यांच्या विनंतीवरून आणि अनु.क्र. 02 यांचे स्थलांतर स्थानीक न्यायालयात झाले असल्यामुळे त्यांना प्रवास भत्ता व रूजु कालावधी अनुज्ञेय रहाणार नाही.

कार्यालय प्रमुख/आस्थापना प्रमुख यांना कळविणेत येते की, स्थलांतरीत कर्मचारी यांना कार्यमुक्त करून त्यांना नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेबाबत सुचित करावे.

अनु.क्र 7 आणि 8 वरील उमेदवार हे कनिष्ठ लिपीक पदाचे निवड यादी मधील उमेदवार क्र.51 आणि 52 असुन त्यांची संबंधीत पदावर **तात्पुर्ती** नेमणूक करण्यात येत आहे. सदर नेमणूक ही अस्थायी स्वरूपाची असुन सदरील उमेदवारांना केंव्हाही कोणत्याही प्रकारची नोटीस न देता कमी करण्याचे अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहतील. जर त्यांना सेवा सोडण्याची ईच्छा असल्यास त्यांना प्रथम एक महिन्याचे वेतन भरावे लागेल किंवा त्या ऐवजी एक महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल. त्यांनी आदेश प्राप्त झालेच्या दिनांकापासून सात (07) दिवसांचे आत नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे. कामावर हजर होतेवेळी त्यांना भारतीय घटनेप्रमाणे शपथ घ्यावी लागेल. जर ते मुदतीत कामावर हजर झाले नाहीत तर त्यांना देण्यात आलेली नियुक्ती रद्य करण्यात येईल व त्यांचे नाव **कनिष्ठ लिपीक पदाचे निवड यादीतुन कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

तसेच नवनियुक्त कनिष्ठ लिपीक या पदावर नियुक्त करण्यांत आलेल्या उमेदवारांनी कर्तव्यावर हजर झालेनंतर पंधरा दिवसाच्या आत मत्ता व दायित्वचे प्रपत्र विहित नमुन्यात जिल्हा न्यायालयास सादर करावे.

संबंधीत कार्यालय प्रमुख यांना सुचित करण्यांत येते की, स्थलांतरीत झालेले कर्मचारी यांना जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद परिपत्रक क्रमांक काव्यवि/प्रशा/5071/2012, दिनांक 19 मे, 2012 चे अनुषंगाने आपआपसांत चार्ज (कार्यभार हस्तांरित) लेखी घ्यावा व द्यावा याबाबत सूचना देण्यांत याव्यात. तसेच सदर परिपत्रकाचे तंतोतंत पालन करणेबाबत सुचित करावे.

जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद. [ ]
दिनांक : 24 जानेवारी, 2025 [ ]

**( स्वप्नील चं. खटी )**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, **उस्मानाबाद.**

जा.क्र./काव्यवि/प्रशा/ 628 /2025.
दिनांक : 28 जानेवारी, 2025.

**याची एक प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :–**

1) जिल्हा न्यायाधीश–1, **उमरगा/परंडा.**
2) दिवाणी न्यायाधीश व. स्तर, **कळंब.**
3) दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **तुळजापूर.**
4) सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **उमरगा/परंडा.**
5) जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद, नोटीस बोर्ड.

<u>याची एक प्रत :</u>

1) सहाय्यक अधिक्षक, रो.वि.ले.शाखा, जिल्हा न्यायालय, <u>उस्मानाबाद</u>
2) कनिष्ठ लिपीक, संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांना सुचित करण्यांत येते की, सदरील आदेश हे जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांचे अधिकृत संकेतस्थळावर <u>तात्काळ</u> प्रसिध्द करावेत.
3) **श्री.लक्ष्मण प्रकाश गोरवे,** (कनिष्ठ लिपीक, निवड यादी–2024, उमेदवार क्र.51)
   रा. मु.पो.राघुचीवाडी,. ता.जि.धाराशिव.**(By RPAD)**
4) **श्री.सागर विलासराव गवळी,** (कनिष्ठ लिपीक, निवड यादी–2024, उमेदवार क्र.52)
   रा. साई नगर, गल्ली नंबर–01, हिरो शोरुम समोर, धाराशिव, ता.जि.धाराशिव.**(By RPAD)**